॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पेट २०२४ मधील विद्यार्थ्यांसाठी प्री - पीएच.डी. कोर्सवर्कचा प्रारंभ आज दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी एकूण ९२% संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत, कोर्सवर्क अध्यक्ष व अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, प्रा. भुषण चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्र-कुलगुरू यांनी विद्यार्थ्यांना संशोधनविषयांची निवड करतेवेळी सामाजिक समस्या तसेच नवनवीन शोध यासंदर्भात आवश्यक असणारे विषय निवडावेत आपल्या संशोधनाचे पेंटट होईल असे दर्जेदार समाजपयोगी संशोधन करावे असे आवाहन केले. या प्रसंगी प्राचार्य एस.एस. राजपूत व प्रा. अनिल डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संशोधन विभागाचे सहा. कुलसचिव (अ.का.) प्रवीण चंदनकर यांनी केले. या कोर्सवर्क करीता प्रा. प्रशांत सोनवणे हे समन्वयक म्हणून कार्य करीत आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील सर्व विषय व विधी विषयासाठी दि. ३ ते ५ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आले आहे. एकूण ३१५विद्यार्थ्यांपैकी २८७विद्यार्थी उपस्थित होते.सकाळ सत्रात प्रा. भूषण चौधरी यांचे तर दुपार सत्रात प्रा.दिपक दलाल व प्रा.एम.झेड चोपडा यांनी मार्गदर्शन केले. संशोधन विभागातील कर्मचारी संजय ठाकरे, सुनील अढाव, ललित काटकर, यशवंत शिसोदे, श्रावण पाटील, मनोहर पाटील, शुभम धुमाळ, नरेंद्र तायडे, पियुष भावसार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ ऑक्टोबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०३ ऑक्टोबर - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विचारधारा प्रशाळेअंतर्गत गांधी सप्ताहानिमित्त महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे दि. २ ऑक्टोबर २०२५ ते ०७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'गांधी सप्ताह' चे आयोजन करण्यात आले. यात भित्तिपत्रक स्पर्धा, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

आज दि. ०३ ऑक्टोबर रोजी गांधी सप्ताहानिमित्त भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण १९ स्पर्धकांनी यात सहभाग घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे म्हणाले की, गांधी सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गांधी विचारांची जाण वाढविण्यासह राष्ट्रभक्ती, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ होत असल्याचे प्र-कुलगुरूंनी सांगितले.

स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत आणि महात्मा गांधी, गांधीजीच्या चष्म्यातून भारत, मोहनदास ते महात्मा आणि इंग्रज विरुद्ध गांधी या विषयांवर आकर्षक भित्तीपत्रके सादर केली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गांधी विचारांचे प्रत्यक्ष चित्रण करत स्वच्छता, सत्य, अहिंसा आणि स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा अधोरेखित केली.

कार्यक्रमाला विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, विद्यापीठातील प्राध्यापक वृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. कैलास दांडगे, डॉ. प्रीती सोनी आणि डॉ. दिपक खरात तर स्पर्धेचे समन्वयक प्रा. प्रदीप गोफणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शेख मोईन यांनी केले तर प्रा. नेहा पाटील, प्रा. मनोज इंगोले आणि प्रा. रोशन मावळे यांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ ऑक्टोबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता